# देवाची ओळख

एखाद्या उपवर कन्येला आपण ती विवाहीत झाल्याशिवाय सौभाग्यवतीचा दर्जा देत नाही. उपवर कन्या विवाहास पात्र असते यात काहीच संशय नाही. परंतू वरसंशोधन करुन विधिवत तिचा विवाह संपन्न केल्याशिवाय तिला सौभाग्यलेणं लाभत नाही. देवाच्या भक्तिचंही अगदी असंच आहे. ज्या देवाची भक्ती करावयाची त्याची आधी ओळख होणे अगत्याचे आहे. याचाच अर्थ देवाची ओळख होणे ही भक्ती सुरु होण्यासाठी अनिवार्य बाब आहे. साधु-संतांनी परमेश्वराला ओळखण्याचाच सल्ला दिलेला आहे. समर्थ रामदास स्वामी लिहितात की,

**आधी देवासी ओळखावे | मग त्यासी अनन्यभावें भजावे | अखंडचि ध्यान धरावें | सर्वोत्तमाचे |**

एखाद्या नवीन ठिकाणी आपल्याला जायचे असेल तर त्या ठिकाणाबद्दलची जेवढी मिळेल तेवढी माहिती आपण जमा करतो. त्याठिकाणी अगोदर जाऊन आलेल्या लोकांकडून तिथले ठाव-ठिकाणे जाणून घेतो. मग प्रत्यक्ष त्याठिकाणी पोहोचल्यानंतर त्याला या जाणकारीचा फायदा होतो. अगदी याच पद्धतीने देवाची ओळख करुन घेण्यासाठी सुद्धा आपण देवाचे स्वरुप कसे आहे याची जाणकारी प्राप्त केल्यास प्रत्यक्ष ब्रह्मज्ञान प्राप्तीच्या वेळी त्याचा लाभ होतो. संपूर्ण अवतारवाणी या ग्रंथात शहंशाह बाबा अवतारसिंहजी महाराजांनी या परमात्म्याचे वर्णन करताना म्हटले आहे-

**निराकार तो केवळ हाची ज्यास कोणता ना आकार |**
**याचा नाही अंत समजला काही न याचा पारावार ||**

बाबा अवतारसिंहजी महाराज यांनी म्हटले आहे की, हा परमात्मा निराकार आहे. ह्याला कोणताही आकार नाही. तसेच या परमात्म्याचा अंत कोणीही जाणू शकले नाही, हा अपरंपार आहे, अनंत आहे असे वर्णन केलेले आहे. थोडे बारकाईने विचार करु गेल्यास असे लक्षात येते की पंचभूतात्मक सृष्टी साकार आहे आणि परमात्मा निराकार आहे. वैज्ञानिक दृष्टिने देखिल ही बाब विचार करण्यासारखी आहे. परमात्मा जर आकारात असता तर तो एखाद्या विशिष्ट ठिकाणापर्यन्त सीमीत झाला असता. ज्याअर्थी परमात्मा असीम आहे, अनंत आहे आणि एकमेवाद्वितीय आहे त्याअर्थी त्याला निराकार असणे क्रमप्राप्त आहे. कारण निराकार तत्वच सर्वव्यापी व सर्वांतर्यामी राहू शकते. वास्तविक हे दृश्यमान जगत ही परमात्म्याचीच अभिव्यक्ति आहे. परंतू ते त्याचे शाश्वत स्वरुप नव्हे. ईशावास्योपनिषदामध्ये म्हटले आहे-

**अनेजदेकं मनसो जवीयो नैनद्देवा आप्नुन्पूर्वमर्षत् |**
**तद्भावतोऽन्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ||**

अर्थात, ते आत्मतत्व अढळ आहे, ते एकमेवाद्वितीय आहे, ते मनापेक्षा तीव्र गतिमान आहे. ते इंद्रियगोचर नाही कारण ते सर्वांच्या आधीच सर्वत्र पोहोचलेले (विद्यमान आहे). ते स्थिर असूनही समस्त गतिमानांच्या पुढे जाणारे आहे. त्याच्या सत्तेनेच वायू समस्त प्राण्यांच्या प्रवृत्तीरुप कर्मांचे विभाजन करण्यास सक्षम ठरतो.

परमेश्वराच्या अद्भूत स्वरुपाचे हे वर्णन वाचल्यानंतर निश्चितच आपल्या मनातील देवाबद्दलच्या भ्रामक कल्पना दूर होऊन परमात्म्याच्या शाश्वत स्वरुपाची ओळख व्हावी, अशी ओढ निर्माण होते. परमेश्वर हा वर्णनातील दयेचा सागर आहे. त्याचे वर्णन शब्दांनी करता येण्यासारखे नाही. त्या परब्रह्म परमात्म्याची समर्थ सद्गुरुकडून ओळख करुन घेणे हाच एक पर्याय शिल्लक राहतो. संत एकनाथ महाराजांनी स्पष्ट म्हटले आहे की,

**ओळखिला हरि धन्य तो संसारी |**
**मोक्ष त्याच्या घरी सिद्धीसहीत ||**

वर्तमान समयाला प.पू.निरंकारी बाबा हरदेव सिंहजी महाराजांच्या कृपेने कोणीही जिज्ञासु देवाची ओळख करुन घेऊन आपले इहलोकीचे जीवन सुखमय आणि परलोक मोक्षदायी बनवू शकतो.

- स.वि.लव्हटे
जुईनगर, नवी मुंबई